International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# श्रीमतभगवद्गीता एक शाश्वत सत्य

सौ. सुवर्णा नितीन मुर्‌हेकर

संस्कृत अध्यापिका,स्कुल ऑफ स्कॉलर्स, यवतमाळ

सारांश :

एकं शास्त्रं देवकीपुत्र गीतम्, एको देवो देवकीपुत्र एव |
एको मत्रस्तस्य नामानि यानि कर्माप्यको तस्य देवस्य सेवा ||

अर्थात एकच असे शास्त्र आहे जे देवकीपुत्र भगवान श्रीकृष्णाच्या मुखातून गायिले गेले आहे. प्राप्त करून घेण्यासारखा श्रीकृष्ण हा एकच देव आहे. यात आत्मा हेच सत्य आहे. आत्म्याशिवाय दूसरे काहीही शाश्वत नाही.

पृथ्वीतलावरील मानवी जीवनाच्या अनेक मर्यादा आहेत. त्यापैकी तीन मर्यादा पदोपदी वस्तुस्थिती दाखविते. जसे अपूर्णता, अनिश्चितता आणि अज्ञान. मानवाला कुठल्याही क्षेत्रात आणि व्यवसायात पूर्णति कधीच मिळाली नाही आणि मिळतही नाही. पूर्ण सुख नाही, पूर्ण यश नाही. आज आहे तर उद्या नाही. फक्त मरण सोडून मानवाचे सर्व जीवन अनिश्चित, अनित्य आणि अशाश्वत आहे. मरण सुद्धा केंव्हा येणार याबाबतीत मानव अज्ञानी आहे. कोण, केंव्हा आणि कधी संपेल हे कुणालाच सांगता येणार नाही. अर्थात जीवन हे क्षणभंगूर आहे. तरी सुद्धा मनुष्य स्वार्थ, अहंकार आणि ढोंग या तीन ठळक दुर्गुणांमध्ये जखडून आहे. या दुर्गुणातच सर्वत्र मानव समुहातील सर्व कलहाची बीजे आणि कलहातून होणारे विध्वंस या दूर्गुणातच असेही वस्तुस्थिती दाखविते. अनादी काळापासून आजपर्यंत ज्या विचारवंतांनी मर्यादा आणि दुर्गुण याच्यावर मात करण्यासाठी विचार मांडले त्यात कृष्णाचे विचार अत्यंत योग्य ठरतात. अर्थात भगवदगीतेची गीता ही शाश्वत तत्वज्ञानाचा सर्वात सरळ आणि सुलभ असा सारांश आहे, संपूर्ण मानवजातीसाठीच अमूल्य ठेवा आहे. मनुष्य जीवनातील आयुष्यात वरची पातळी गाठण्यासाठीचे सामर्थ्य भगवदगीतेत आहे.

प्रस्तावना :

महाभारतातल्या महायुद्धाच्या वेळीच भगवान श्रीकृष्णांनी गीता अर्जुनास मार्गदर्शन स्वरूपात सांगितली असे महाभारताच्या कथेत म्हटले आहे. हिंदू वैदीक धर्माच्या मते भगवान श्रीकृष्ण हे भगवान विष्णूचे स्वरूप मानले जातात. हा ग्रन्थ मानवाला परमोच्च ज्ञान देतो आणि जीवन कसे जगावे याचे मार्गदर्शन करतो असे मानले जाते. गीता ही आयुष्यात वरची पातळी गाठण्याची पायरी आहे. या सगळ्यामुळे आयुष्य कसे समृद्ध होते याची शिकवण गीता देते. यामुळे एका विचारावरून दुसर्‍या विचाराकडे धावणारे चंचल मन शांत होते. आपल्या शिकवणीतून गीता आपल्याला मनावर पूर्ण ताबा मिळवायचा मार्ग दाखवते, ती मनुष्याला एका अत्युच्च उंचीवर नेते, मन:शांती आणि स्थैर्य देते. पूर्वीपेक्षा अधिक आणि जगभरातील

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

लोक याच मन:शांतीच्या शोधात आहेत. सततच्या तणावपूर्ण वातावरणात संयमाचे महत्व आता लोकांना पटू लागले आहे.

भगवदगीतेमध्ये सृष्टीची उत्पत्ती, जीव उत्क्रांती हिंदू दूत, क्रम मानवी उत्पत्ती, योग धर्म, कृती, देव, देवता, देवी-देवता, उपासना, प्रार्थना, यम नियम, राजकारण, राजवंश, कुळ धोरण, अर्थ, मागील जन्म, जीवन व्यवस्थापन, राष्ट्रनिर्माण, आत्मा, विधी, तिहेरी संकल्पना, सर्व प्राण्यांमध्ये मैत्री, इत्यादी संकल्पनांचा उल्लेख त्यामध्ये आलेला आहे. जगात सर्वत्र गीतेचा आदर केला जातो. तरीही ही गीता कोणत्याही धर्माचा किंवा संप्रदायाचा ग्रंथ बनू शकला नाही. कारण संप्रदाय कोणत्या ना कोणत्या रूढींनी जखडलेले असतात. भारतात प्रगट झालेली गीता म्हणजे विश्वातील विद्वानांचा अनमोल ठेवा आहे आणि म्हणूनच गीतेला राष्ट्रीय ग्रंथाचा, शास्त्राचा मान देऊन उच्च-नीच भावाने, भेदभावाने तसेच कलह परंपरेने पीडित असणाऱ्या विश्वातील संपूर्ण जनतेला परम शांती देण्याचा प्रयत्न करावा.

श्रीमद भागवत हा योगेश्वर श्रीकृष्णाचा आवाज आहे. त्याच्या प्रत्येक वचनात ज्ञानाचा प्रकाश आहे, जो अज्ञानाच्या अंधारामध्ये वाढतो व ज्ञान, भक्ती, कर्मयोगाने फुलतो. याच मार्गाचे क्रमाक्रमाने वर्णन केले गेले आहे. एखादी व्यक्ती या मार्गावर चालली तर ती नक्कीच सर्वोच्च अधिकारी बनते.

## उद्दिष्ट्ये :

1) मनुष्यजीवनातील भगवदगीतेचे स्थान.
2) भगवदगीता आणि मनुष्यजीवनाचा विकास.
3) लोकहित आणि राष्ट्रहित.
4) श्रीकृष्ण आणि विचार

## विषय प्रतिपादन :

भगवान श्रीकृष्ण हे पृथ्वीतलावर ज्या उद्देशाकरीता अवतारित होतात, त्याच उद्देशाबद्दल बद्ध जीवाला मार्गदर्शन करता यावे, हा उद्देश कोणता ते भगवत् गीता तज्ञांनी सांगितला आहे आणि आपल्याला हा उपदेश जसा आहे तसा मान्य केला पाहिजे. तसे केले नाही तर भगवदगीता आणि त्या गीतेचा प्रवक्ता भगवान श्रीकृष्ण यांना समजून घेण्याचा प्रयत्न करणे व्यर्थ आहे. भगवानी श्रीकृष्णांनी कोट्यावधी वर्षांपूर्वी भगवद गीता सुर्यदेवाला सांगितली. आपल्याला या वस्तूस्थितीचा स्वीकार केला पाहिजे. कोणताही चुकीचा अर्थ न लावता भगवान श्रीकृष्णाच्या प्रामाणिक भगवदगीतेचे ऐतिहासिक महत्व समजून घेतले पाहिजे. श्रीकृष्णाची इच्छा काय आहे हे न जाणता भगवदगीतेचा अर्थ लावणे हा एक मोठा अपराध आहे. या अपराध्यापासून स्वत:चे संरक्षण करण्याकरीता मनुष्याने भगवान श्रीकृष्णाचे प्रथम शिष्य अर्जुन, त्याच्याप्रमाणेच श्रीकृष्णांना पूर्ण पुरूषोत्तम भगवान म्हणून जाणून घेतले पाहिजे. भगवदगीतेचे असे ज्ञान खरोखरीच लाभप्रद आहे व जीवनाचा उद्देश पूर्ण करण्याकरीता मानवसमाजाच्या कल्याणाकरीता प्रमाणित आहे. प्रत्येक मनुष्याला परमसिद्धी प्राप्त करून देते. याचे पूर्ण स्पष्टीकरण भगवदगीतेत आहे. मनुष्याला परमेश्वर किंवा श्रीकृष्ण किती महान आहे व जीवनक्षयाचे सत्य स्वरूप काय आहे हे समजले पाहिजे. प्रत्येकाने जाणले पाहिजे की, जीवात्मा हा नित्य दास आहे व श्रीकृष्णाची सेवा करावयाची जर त्याला इच्छा नसेल तर मायेची (भ्रमाची) सेवा करणे त्याला भाग पडते. मायेची सेवा भौतिक प्रकृतीच्या तीन गुणांच्या विविध अवस्थेत करावी लागते

व अश्या रितीने जन्म आणि मृत्युच्या चक्रातून सतत भटकावे लागते. तथाकथित मुक्त झालेल्या मायावादी तार्किकांनासुद्धा याच चक्रातून जावे लागते. हे ज्ञान म्हणजे एक महान शास्त्र आहे आणि प्रत्येक व्यक्तीने स्वत:च्या हिताकरीता ते स्वीकारले पाहिजे.

मानसिक शांती आणि सुख मिळविण्याकरीता आपल्या इच्छा संपवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मृत्युला घाबरणे व्यर्थ आहे. मृत्यु म्हणजे केवळ आत्मा भौतिक संसारातून आध्यात्मिक संसारात जाणे होय.

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन |
मा कर्मफल हेतुर्भू: मा ते सङ्गोस्त्वकर्मणि ||

कर्म अत्यंत महत्वपूर्ण आहे आणि नेहमी परिणामाची चिंता न करता पूर्ण समर्पणाने कार्य केले पाहिजे. ईश्वर नेहमीच आपलयासोबत कुठेही असोत अन् काहीही करत असोत, गीतेची सर्वाधिक मोलाची शिकवण म्हणजे आपल्या कर्माच्या फळांची अपेक्षा न करणे हेच इष्ट आहे. एकप्रकारे हीच शिकवण आपल्याला आपल्या कार्याप्रती निस्वार्थी बनवते, आपले कार्य ईश्वरचरणी अर्पण करायचा विचार देते आणि जीवनयात्रेचा आनंद कोणतीही अपेक्षा न करता उपभोगायला शिकवते.

निस्वार्थीपणा ही आध्यात्मिक उद्धाराची पहिली पायरी आहे असे गीता सांगते. कारण जेंव्हा मनुष्य या पातळीपर्यंत पोहोचतो तेंव्हा अहंम् विलोप पावतो. जीवन हे कोणत्याही प्रकारचे यश मिळविण्याचा लढा नाही. तर मनुष्य उच्च पातळीवर पोहोचतो आणि अंति आत्मा ब्रह्माशी एकरूप होतो. पिंडापासून ब्रह्मांडाकडे गीता मनुष्याला अत्युच्च उंचीवर पोहोचवू शकते. भावनांच्या कोलाहलाला शमवण्याचे सामर्थ्य गीतेत आहे. मनातील काहूर शांत करण्याची आणि निस्सीम मन:शांती देण्याची शक्ती गीतेत आहे. कठीण परिस्थितीतही जीवनाला धैर्याने सामोरे जाण्यासाठीचा समतोल गीता देते. बऱ्याचवेळा आपल्या पाहण्यात येते की, लोक अगदी क्षुल्लक कारणामुळे क्रोधीत होतात. अश्यावेळेस सहिष्णुतेपेक्षा आक्रमकतेची भावना बळावते आणि समस्या अधिक वाढते. स्वत:च्या प्रतिमेला तडा जाण्याची भीती वाटते असे आणि या सगळ्या प्रकारात नकारात्मकता निर्माण होते. गीता आपल्याला हीच नकारात्मकता नाकारायला शिकवते. निराशेतून उत्पन्न होणाऱ्या भावना या अतृप्त इच्छा, महत्वाकांक्षा आणि बहुतेक वेळा नात्यांमधून निर्माण होतात, ज्या सगळ्यांचे मुळ असते अपेक्षा. वैफल्यातून निर्माण होणारा क्रोध हाच या सगळ्यातून निर्माण होणारा असतो. क्रोध मनुष्याला सर्वतोपरी अंध करतो. दुसऱ्या बाजूला संयम हेच दृढ मानसिक शक्तीचे प्रतिबिंब असते.

क्रोधाभ्दवति सम्मोह: सम्मोहात्स्मृतिविभ्रम: |
स्मृतिभ्रंशाद् बुध्दिनाशो बुध्दिनाशात्प्रणश्यति ||

गीता सांगते – क्रोधामुळे संभ्रम होतो, संभ्रमामुळे स्मरणशक्ती जाते, स्मरणशक्ती गेल्याने विवेकबुद्धी नष्ट होते आणि विवेकबुद्धी नष्ट झाल्याने विनाश होतो. पण एक संयमी आत्मा जो सगळ्यांच्यात वावरत असतो, आपुलकी किंवा घृणा या दोन्हींपासून अलिप्त, त्यालाच चिरंतन शांती प्राप्त होते. यावर स्वामी चिन्मयानंद (चिन्मय मिशन) सांगतात – एका संभ्रमी मतीमुळे चांगले-वाईट यातला फरक ओळखण्याची क्षमता गमावली जाते. त्यालाच सोप्या भाषेत सद्सदविवेकबुद्धी म्हणतात, जी बहुतेक वेळा आपल्यात एक परिणाम तयार करते आणि मनाला सावध करते, ती कायम टिकायला हवी.

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

कृष्ण-अर्जुन संवादाची पार्श्वभूमी रणांगण आहे. मानवी जीवन हे अथ ते इतिपर्यंत संघर्षमय आहे. वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक आणि राष्ट्रीय जीवनात प्रत्यख युद्ध नसले तरी रात्रंदिन युद्धाचे प्रसंग आहेत. त्या प्रसंगांना तोंड देताना मानवाने आपला ऐहिक आणि आध्यात्मिक उत्कर्ष कसा करावा हे कृष्ण सांगतात. सृष्टीनिर्माता एकच आहे आणि तोच सृष्टीचा एकमेव नियता आहे. मानव त्याला देव मानतात.

अध्यात्मज्ञानासाठी मानवाचा आहार-विहार माफक, धर्म प्रमाणीशीर आणि निद्रा-जागृती व्यवस्थित असली पाहिजे. हिंदूचा धर्म या शब्दाची शक्ती अभ्यासकांना आश्चर्यचकित करते. जेंव्हा कर्णाच्या रथाचे चाक जमिनीत रूतले तेंव्हा कर्णाने अर्जुनाला धर्माने लढण्यास सांगितले. “तेव्हा कुठे गेला होता तुझा धर्म” असे खडसावून सांगत कृष्णाने कर्णाच्या अधर्माचा पाढा वाचला. स्वराज्यातही सर्व क्षेत्रातील आणि व्यवसायातील अधर्मी यशवंत संकटकाळी धर्माचा धावा करतात. गीता सांगते की धर्म अधर्मीयांचे कधी रक्षण करीत नसतो. अधर्माला क्षमा करणे म्हणजे धर्माची पायमल्ली करणे होय. धर्माने अधर्मीयांना कठोर शिक्षा केलीच पाहिजे. खऱ्या राष्ट्रभक्त राजकर्त्यांच्या राजनीतीचे प्रमुख सुत्र “शष्ठ्यम् प्रति शाष्ठ्यम्” असे कृष्ण सांगतात. कृष्णाची उक्ती आणि कृती सदैव एकसारखी होती. लोकहित आणि राष्ट्रहित यामध्ये व्यक्तिहित असते, हे कृष्णाच्या विचारांचा गाभा होता, जे मानव स्वहित साधण्यासाठी लोकहिताचा आणि राष्ट्रहिताचा बळी देतात, ते आत्मघात करतात. हा कृष्णाच्या कार्याचा मानवप्राण्याला संदेश आहे. व्यक्ती व्यक्तीमध्ये कृष्णाने चुकून सुद्धा भेदभाव केला नाही. कृष्णाची विचारसरणी उच्चतम होती. अमीर, फकीर, राव आणि रंक महान आणि लहान ही क्षुद्रतम विचारसरणी आधुनिक प्रतिष्ठित म्हणून समाजात मिरविणाऱ्या भोंदूची आहे. जी कामे स्वराज्यात तथाकथित मान्यवर हीन म्हणतात ती कामे कृष्णाने आत्मीयतेने केली.

## निष्कर्ष :

भगवद्गीता हा मानवी उत्क्रांतीच्या प्रत्येक घटनाक्रमाबाबत प्रशिक्षण देणारा आणि या विशाल सृष्टीतील प्रत्येक स्तरावर प्रकाश टाकणारा एकमेव ग्रंथ आहे. भगवत गीता आपणास कर्तव्याचे पालन करताना समता आणि समतोल राखण्याचे भान देते. श्रीकृष्ण प्रत्येकाला हाती शस्त्र घेऊन लढण्या-झगडण्यासाठी प्रवृत्त करत नाहीत. भगवत गीता तर्क आणि संवाद दोन्हीला चालना देते. अर्जुनासोबत जी परिस्थिती झाली होती तेव्हा भगवानांनी टप्प्या टप्प्याने प्रारंभी अर्जुनाच्या भावनांना सांभाळले, मग त्याच्या अहंकाराला, मग मनातील विविध विचार आणि धारणांना, अखेरीस अर्जुनाच्या आध्यात्मिक चेतनेवर प्रकाश टाकला. त्याला अतिउच्च ज्ञान प्रदान केले आणि त्याच्या अविनाशी रूपाची ओळख करून दिली. या सर्वामुळे तर अर्जुनामध्ये अभूतपूर्व शक्तीचा उदय झाला आणि तो आपली प्रापंचिक कर्तव्ये पार पाडण्यासाठी प्रेरित झाला.

गीतेची व्याप्ती वैश्विक आहे, तीची शिकवण जातीधर्माच्या बंधनापलीकडील आहे. जगातील सर्वोत्कृष्ट आध्यात्मिक ग्रंथापैकी मानली जाणारी गीता ही आयुष्याला सत्य आणि सदाचाराचा मार्ग दाखवणारी नैतिक दिशादर्शक आहे. गीतेच्या अभ्यासातून मिळणारी शांती आणि भव्यता अतुलनीय आहे. कृष्णाने सांगितलेले पूर्ण सत्य म्हणजेच ही गीता श्रीकृष्णाने अर्जुनाला कुरूक्षेत्रावर दिलेले ज्ञान-तत्वज्ञान, हे सर्व गीतेत उलगडत जाते.

सामान्य लोक विशेषकरून कलियुगात कृष्णाच्या बहिरंगा शक्तिने मोहित होतात आणि त्यांना चुकीने असे वाटते की, भौतिक सुखाच्या साधनांचा विकास केला तर प्रत्येक मनुष्य सुखी होईल. त्यांना ही मुळी

जाणीवच नाही की बहिरंगाश कर्म किंवा भौतिक प्रकृती अत्यंत बलवान आहे. कारण भौतिक प्रकृतीच्या कडक नियमांनी प्रत्येकाला दृढपणे बांधून ठेवलेले असते. परमेश्वराचा अंश या नात्याने जीवात्मा अतिशय आनंदी असतो आणि अशाप्रकारे परमेश्वराची तत्परतेने सेवा करणे हा त्याचा नैसर्गिक स्वभावधर्म आहे. मायाशक्तीद्वारे मोहित झाल्यामुळे मनुष्य वेगवेगळ्या प्रकारे स्वत:च्या इन्द्रीयांना संतुष्ट करून सुखी होण्याचा प्रयत्न करतो. परंतु या पद्धतीने तो कधीही सुखी होत नाही. स्वत:च्या भौतिक इन्द्रीयाचे लाड पुरविण्याऐवजी त्याने परमेश्वराच्या इन्द्रीयांना संतुष्ट केले पाहिजे, हीच जीवनाची परमसिद्धी आहे.

## संदर्भ सूची :

1. कृष्णनीती – डॉ. गिरीश जाखोटिया.
2. यथार्थ गीता – स्वामी अडगडानन्दजी महाराज.
3. भगवदगीता जशी आहे तशी – स्वामी प्रभुपाद.